OW/DCP TRAFFIC THN/ADM/NOTIFICATION/19/2023
पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, यांचे कार्यालय,
तीन हात नाका, एल.बी.एस मार्ग नौपाडा ठाणे.
दिनांक:–22/०५/२०२३

—: वाहतुक नियंत्रण अधिसुचना :—

ज्याअर्थी, दिनांक २३/०५/२०२३ रोजी श्रमजीवी संघटना – महाराष्ट्र यांच्या कडून आदिवासीच्या वनहक्क पुरावा मोर्चास छत्रपती शिवाजी महाराज मैदान तलावपाळी जवळ चितामणी टॉवर नाका येथून मोर्चा निघून टेंभी नाका, कोर्ट नाका मार्गे पॅव्हेलियन हॉटेल समोर सभेत रूपांतर होणार आहे. पॅव्हेलियन हॉटेल समोरील रोड अरूंद असल्याने या रोडवरील व परिसरांतील वाहतुक सुरळित व सुनिश्चित व्हावी व नागरिकांची गैरसोय होवू नये याकरिता आम जनतेच्या सोईसाठी,

त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार राठोड, ठाणे पोलीस आयुक्तालयाचे वाहतुक विभागाचे पोलीस उप आयुक्त म्हणून मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए–११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंदः** – १) ठाणे कोर्ट नाक्याकडून पॅव्हेलियन हॉटेल मार्गे आरटीओ, ठाणे मध्यवर्ती कारागृहाकडे जाणारा रस्ता पॅव्हेलियन हॉटेल येथे सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग**:– १) ठाणे कोर्ट नाक्याकडून पोलीस स्कूल मार्गे, पारेख ट्रान्सपोर्ट मार्गे इच्छुक स्थळी जातील.
२) ठाणे कोर्ट नाक्याकडून जीपीओ मार्गे आरटीओ कार्यालय, ठाणे मध्यवर्ती कारागृहाकडून क्रिक नाका मार्गे इच्छुक स्थळी जातील.

सदरची वाहतुक अधिसूचना ही दिनांक २३/०५/२०२३ रोजी सकाळी ०८:०० वा. पासून ते कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील. सदरची वाहतुक अधिसूचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक विभाग
ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहीतीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे

PTO

प्रत कार्यवाहीसाठी :—
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन,ठाणे.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—१,ठाणे व ५ वागळे इस्टेट, विशेष शाखा,ठाणे शहर
प्रतः—पोलीस उपायुक्त, आथिक गुन्हे,ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहीतीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
प्रतः—समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष.ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रतः सपोआ ठाणे वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, राबोडी वाहतूक शाखा.